आ.क्र:-८८७६/१५ 19 NOV 2015

धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय
तिसरा मजला, ८३, डॉ.ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई -४०००१८.
दिनांक : १७.११.२०१५

19 NOV 2015

**परिपत्रक क्रमांक** ४४० **दिनांक** १७.११.२०१५.

असे निदर्शनास आले आहे की या कार्यालयातील बरेचसे कर्मचारी पुर्वपरवानगीशिवाय रजा उपभोगतात व रजा उपभोगून परत आल्यावर रजेचे अर्ज सादर करतात. काही कर्मचारी त्यांना शक्य असुनही पूर्व परवानगीने रजा उपभोगत नाही. तसेच वारंवार रजा उपभोगण्याचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे कार्यालयीन कामात अडचणी निर्माण होऊन कामकाजाचा खोळंबा होतो.

तरी, कार्यालयीन शिस्तीच्या दृष्टीने सर्वच कर्मचाऱ्यांनी अत्यावश्यक असेल त्याचवेळी प्रथम अर्ज देऊन पूर्व परवानगीने रजा मंजूरीनंतरच त्यांच्याकडील कामाची माहिती इतर कर्मचाऱ्यांवर सोपवून रजेवर जावे. तसेच वैद्यकीय रजेबाबत अधिक्षक किंवा संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ लेखी अथवा मौखिकरीत्या कळविण्यात यावे.

सर्व कर्मचाऱ्यांनी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. याबाबत कसून केल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

(श.भा.सावळे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई